# कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२७३/२०२५ दि. २३/१२/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी, कळवा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली रचना कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे कडुन वडपे ते ठाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील खारेगाव येथील भुयारी मार्गाचे बांधकाम दोन टप्यामध्ये करण्यात येणार असुन दिनांक १५/१२/२०२५ रोजी पासुन मुंबई नाशिक वाहिनीवरील काम करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) मुंबई – नाशिक महामार्गा वरील खारेगाव अंडरपास मधुन खारेगावकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव अंडरपास** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने खारेगाव बंद टोलनाका येथून डावीकडे वळण घेवून गॅमन – पारसिक सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) नाशिक मुंबई महामार्गावरील खारेगाव अंडरपास येथे खाली उतरणाऱ्या व खोरगावकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव अंडरपास** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने पुढे साकेत कट येथे डावे वळण घेवुन साकेत कॉम्प्लेक्स पुढे क्रीक नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) खारेगाव मधुन खारेगाव कट येथील अंडरपासचा वापर करुन भिंवडीच्या दिशेने जाणारी तसेच खारेगाव अंडरपास येथुन ठाण्याचे दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहने यांना **खारेगाव अंडरपास** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारेगाव – पारसिक सर्कल – गॅमन सर्कल – खारेगांव बंद टोलनाका येथुन पुढे इच्छित स्थळी जातील. तसेच ठाणे शहराकडे जाणारी वाहने खारेगाव, कळवा नाका येथुन पुढे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दि. १५/१२/२०२५ रोजी दुपारी १२:०० ते दि. ०९/०४/२०२६ रोजी रात्री २४:०० वा. पावेतो** २४ तास अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.